| MHSO070003172018 | नियमित दिवाणी दावा क्र. २५२/२०१८ मधील निशाणी क्र. ३१ वरील आदेश<br>(सुनिल इकारे वि. दत्तात्रय ढोंबरे)<br>(पारीत दिनांक – १०/०६/२०२५) |
|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल करुन नि.क्र. १६ वरील त्याचे कैफियमध्ये पान क्र. ४ व ५ वरील दि. २७/०४/२०१८ ही तारीख टायपिंग मिस्टेकने (Typographical mistake) झाली असल्याने त्याऐवजी दि. २२/१२/२०१६ अशी तारीख नमुद करण्यासाठी व त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे.

२. प्रतिवादीचे थोडक्यात कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द रक्कम वसुल होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादीने कैफियत देऊन वादीचा दावा नाकबुल केला आहे. सदर नि.क्र. १६ वरील कैफियतीत पान क्र. ४ वर एकदा व पान क्र. ५ वर दोनदा टायपिंग मिस्टेकने (Typographical mistake) पोकळ कागदावरील तारीख २७/०४/२०१८ अशी नमुद झाली असून सदरची तारीख २२/१२/२०१६ अशी आहे. तरी सदरची दि. २७/०४/२०१८ या तारखेला काट मारून दि. २२/१२/२०१६ अशी तारीख नमुद करण्यास परवानगी मागितलेली आहे. सदर दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असुन त्यामुळे दाव्याच्या मागणीत व स्वरुपात कोणतेही बदल होणार नाही. सबब, प्रतिवादीने त्याचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे. तसेच प्रतिवादीने प्रस्तुत अर्जाच्या पृष्ठ्यार्थ त्याचे शपथपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे.

३. याउलट, वादीने सदर अर्जावर नि.क्र. ३३ वर त्यांचे लेखी म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज हा खरा व कायदेशिर नसुन त्यास विरोध दर्शविलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीने जाणीवपुर्वक सदरचे प्रकरण लांबणीवर पडावे याहेतूने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असुन प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द रक्कम वसुल होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीचे सदर अर्जाद्वारे म्हणणे आहे की, त्याने नि.क्र. १६ वरील कैफियतीत पान क्र. ४ वर एकदा व पान क्र. ५ वर दोनदा टायपिंग मिस्टेकने (Typographical mistake) पोकळ कागदावरील तारीख २७/०४/२०१८ अशी नमुद झाली असून सदरची तारीख २२/१२/२०१६ अशी आहे. तरी सदरची दि. २७/०४/२०१८ या तारखेला काट मारून दि. २२/१२/२०१६ अशी तारीख नमुद करण्यास व त्याअनुषंगाने दुरुस्ती करण्याकरीता परवानगी मागितलेली आहे. वादीचा आक्षेप आहे की, प्रतिवादीने प्रस्तुत अर्जातील कथने खोटे असल्याचे कथन केले असुन प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे. मात्र, प्रतिवादीने त्याच्या कथानाच्या पृष्ठ्यार्थ नि. क्र. ३२ वर शपथपत्र दाखल केलेले आहे. महत्वाचे म्हणजे, प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार नाही व सदर नियोजित दुरुस्तीमुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही असे मला वाटते. त्याचप्रमाणे, वादी व प्रतिवादी यांच्या मधील वाद हा कायमस्वरुपी मिटविण्याकरीता सदरची दुरुस्ती ही आवश्यक असल्याचे दिसुन येते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. प्रतिवादीचा निशाणी क्र. ३१ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने प्रस्तुतची दुरुस्ती ही १४ दिवसांच्या आत करावी व दुरुस्तीची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

KANCHAN JAYWANT KHOMANE

Digitally signed by KANCHAN JAYWANT KHOMANE
Date: 2025.06.10 17:02:56 +0530

**(के.जे. खोमणे)**

**दिनांक – १०.०६.२०२५.**

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**पंढरपूर, जि. सोलापूर.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | A.B. Sandrok |
| Court | - | 2nd Jt. CJJD & JMFC, Pandharpur. |
| Date of Judgment/Order | - | 10/06/2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 10/06/2025 |
| Judgment/Order uploaded on | - | 10/06/2025 |